दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २५८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.१३ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## माथेरानमध्ये पर्यटक महिलेची शिरच्छेद करून निर्घृण हत्या

**दै.रायगड नगरी । कर्जत**

पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरान मध्ये पर्यटनास आलेल्या जोडप्यातील इसमा कडून त्याच्या बरोबर असलेल्या महिलेला शिरच्छेद करून धड तिथेच घटनास्थळी ठेऊन तिचे शीर घेऊन सदर इसम पसार झाला आहे व महिलेचे प्रेत निर्वस्त्र अवस्थेत आढळले.

शनी.दि.११ रोजी पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मध्ये एक तरुण जोडपे पर्यटनासाठी आले होते. माथेरान येथील इंदिरा नगर परिसरात असलेल्या खाजगी लॉजिंग मध्ये त्यांनी रूम घेतली.शनिवारीच्या रात्री या महिले सोबत असलेल्या इसमाने या महिलेचा शिरच्छेद करून तिला निर्वस्त्र अवस्थेत पलंगाखाली ठेऊन तिचे शीर घेऊन पळ काढला असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच माथेरान पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संजय बांगर ,नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर तसेच कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी व्ही.पी. लगारे आणि कर्जत ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सुजाता पत्की यांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे.

मृत महिलेचे सदर इसमाने शीर सोबत घेऊन गेल्याने घटनास्थळी फक्त धड असल्यामुळे त्या मृत महिलेची ओळख पटण्यासाठी पोलिसांना अडचणी येत आहेत. त्या महिले सोबत राहिलेल्या इसमाने आपली ओळख लपविण्याचा देखील प्रयत्न केला असून तेथील लॉजच्या नोंद वहीत महिलेचे नाव रुबिना बेन व तिच्या सोबत असलेल्या व्यक्तीचे नाव अमजद खान अशी खोटी माहिती भरली असल्याचे पोलिसांच्या निदर्शनात येत आहे.या घटनेमुळे नेहमी शांत असणारे माथेरान पुरते हादरले आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवे वर बसची टँकरसह कामगारांना धडक ; ३ ठार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

**मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर अपघाताची मालिकाच सुरू असून सध्या बोरघाटात या महामार्गाचे आणखी रुंदीकरण करण्याचे काम सुरू आहेत. त्यामुळे काम करणाऱ्या यंत्रणेसह वाहने व कामगार कार्यरत आहेत. ११ डिसेंबर रोजी लोणावळ्याहुन रात्रीच्या वेळेस मुंबईकडे वऱ्हाडी प्रवासी घेऊन भरधाव वेगात जात असताना किमी ३६ जवळ काम सुरू असलेल्या ठिकाणी मध्यरात्री बसने सिमेंटच्या बलकर टँकरला जोरदार धडक दिल्याने या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना ही धडक बसल्याने यात तीन जणांचा मृत्यू झाला तर अन्य जखमी झाली. तसेच प्रवासी वऱ्हाडी ही किरकोळ जखमी झाले असून त्यांना तात्काळ उपचारासाठी पाठविण्यात आले. या अपघातात आणखी दोन वाहनांचे नुकसान झाले आहे.**



याबाबत मिळालेली माहिती अशी की ११ डिसेंबर रोजी लोणावळ्याहून लग्न समारंभ आटपून मुंबईच्या दिशेने मध्यरात्री ही बस एक्सप्रेस वे मार्गे निघाली असता एक्सप्रेस वे वर जादा लेनसाठी बोरघाटात काम सुरू असल्याने याठिकाणी दिवस व रात्र पाळीत यंत्रणेसह कामगार कार्यरत आहेत. सदरची बस भरधाव वेगात येऊन या ठिकाणी उभा असणारा सिमेंट मिक्सर बलकरला बसने जोरदार धडक दिली व अपघात केला.

त्यामुळे याठिकाणी असणारे कामगार नितेश दशरथ कांबळे रा.खोपोली शांतीनगर, बबलू, जगदीश राज या कामगारांना सुद्धा जोरदार धडक बसल्याने तिघांचा मृत्यू झाला तर बस मधील प्रवासी किरकोळ जखमी झाले तर या अपघातात आणखी दोन वाहनांना धडक बसल्याने एकूण चार वाहनांचे नुकसान झाले आहे.

या घटनेच्या ठिकाणी तात्काळ आय आर बी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, लोकमान्यची ॲम्ब्युलन्स व्यवस्था, बोरघाट पोलीस, खोपोली पोलीस, कंपनीचे कर्मचारी, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य तसेच मृत्युंजय देवदूत या ठिकाणी मदत करत होते.

## देश व सामान्य लोकांसमोर असंख्य प्रश्न, यावर आपल्यालाच उपाय शोधायचा आहे: शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांना ८१ व्या वाढदिवसानिमित्त देशभरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने नेहरु सेंटर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी शरद पवार यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. या सोहळ्यात शरद पवार यांनीही अनेक जुन्या गोष्टी, आठवणींना उजाळा दिला. तसेच देश व सामान्य लोकांसमोर असंख्य प्रश्न, यावर आपल्यालाच उपाय शोधायचा आहे, असे आवाहनही शरद पवार यांनी केले.

१२ डिसेंबर माझ्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी माझा वाढदिवस असतो, म्हणून नाही, तर माझ्या आईचा वाढदिवस असतो, म्हणून हा दिवस माझ्यासाठी खूप खास आहे. यावर्षीचा वाढदिवस साजरा करण्याचे औचित्य नाही. मात्र, .../२



## संक्षिप्त...

### मद्यपान करून वाहन चालवल्यास १० हजारांचा दंड



**दै.रायगड नगरी । ठाणे**

मद्यसेवन करून वाहन चालवल्याबद्दल सध्या असलेला दोन हजार रुपयांचा दंड येत्या पाच दिवसांत १० हजार रुपये केला जाईल, अशी माहिती वाहतूक शाखेचे उपायुक्त बाळासाहेब पाटील यांनी दिली. केंद्र सरकारने या कायद्यात बदल केले असून राज्यात त्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयात या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. वाढीव दंड वसुलीसाठी यंत्रामध्ये बदल करण्याचे काम सुरू असून त्याला पाच दिवस लागतील, असे पाटील म्हणाले.

दरम्यान, मुंबईतही नवीन मोटार वाहन कायद्याबाबत प्रणाली अद्ययावत करण्याचे काम सुरू असून ते पुर्ण झाल्यानंतर लवकरच सुधारित दंडाची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती मुंबई वाहतूक सहपोलीस आयुक्त राजवर्धन सिन्हा यांनी दिली. मुंबईत वाहतूक पोलिसांना त्यांचे डिव्हाईस मास्टर अपडेट करण्यास सांगण्यात आले आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे डिव्हाईस अपडेट नाही त्यांनी चलान करू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्य सरकारने १ डिसेंबरपासून सुधारित मोटार वाहन कायदा लागू केला आहे. भरधाव वेगात वाहन चालवणे, विनासीटबेल्ट, विनाहेल्मेट, वाहतूक नियमांची पायमल्ली, दुचाकीवरून अतिरिक्त प्रवासी वाहतुकीसह अनेक वाहतूक नियमांत सुधारणा करून त्यात दंड वाढवण्यात आला. त्यात पाच ते दहापट रकमेची वाढ केली आहे. अनेक गुन्ह्यांमध्ये परवाना रद्द करण्याची येणार असल्याची तरतूद केली आहे.

## माथेरानचे भाजपवासी नगरसेवक अखेर सेनेच्या स्वगृही परतले



**दै.रायगड नगरी । माथेरान**

नव्या पक्षात प्रवेश केल्यानंतर तिथे होत असलेल्या घुसमटीला कंटाळून अखेरीस भाजपवासी झालेल्या दहा नगरसेवकांपैकी तीन नगरसेवक पुन्हा आपल्या स्वगृही अर्थातच शिवसेनेत डेरेदाखल झाले आहेत. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवा सेनेचे आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली खासदार संजय राऊत आणि मुंबईच्या महापौर,जिल्हा संपर्क प्रमुख किशोरीताई पेडणेकर यांच्या उपस्थितीत सुषमा जाधव, सोनम दाभेकर आणि ज्योती सोनावणे या तीन नगरसेविकांनी शिवसेनेत जाहीरपणे पुनरप्रवेश केला आहे.यावेळी रायगड जिल्हा प्रमुख मनोहर भोईर, युवा सेनेचे जिल्हा अधिकारी मयूर जोशी, कर्जत युवा संपर्क प्रमुख ओंकार चव्हाण,माथेरान नगरपालिका गटनेते प्रसाद सावंत, नेरळ युवा सेना सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य प्रथमेश मोरे ,विधान सभा संपर्क प्रमुख राजेश कुचिक,माजी नगरसेवक कुलदीप जाधव, सचिन दाभेकर आदी उपस्थित होते.

२७ मे २०२१ रोजी शिवसेनेतुन भाजप मध्ये दहा नगरसेवकांनी प्रवेश केला होता. परंतु पूर्वीपासून शिवसेनेशी नाळ जुळलेली असल्याने भाजप मध्ये होत असलेली घुसमट यामुळेचदहा पैकी .../२

## अहो नितीन राऊत साहेब तुमच्या राज्यात चाललंय तरी काय? जनतेचा सवाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महावितरणाचा कारभार आंधळ दळतयं आणि कुत्रं पिठ खातयं असा सुरू असल्याचा आरोप जनतेतून होत आहे. याला आपली संमती असल्याचे विविध ठिकाणचे उपकार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता दुजोरा देत असल्याचे दिसत आहे.

रायगड जिल्ह्यात विद्युत वितरणाचा कारभार हा रामभरोसे असून विद्युत वितरण बिलाची थकबाकी भरली नाही तर विना नोटीस विद्युत प्रवाह कापला जातो. परंतु नागरिकांना सुविधा देण्याची संकल्पनेला आपण मुठमाती देण्याचे सांगितले आहे का? आपले अधिकारी रामभरोसे कारभारावर जगत असून जनतेचा विचार कोणताही केला जात नाही. रायगड जिल्ह्यात गेलेला विद्युत प्रवाह सुरू होण्यासाठी किमान ५-५ तास लागत आहेत. आणि विद्युत वितरण कंपनीचे बिल न भरल्यास तात्काळ विद्युत प्रवाह बंद केला जातो यामागे आपला हप्ते वसुल करण्याचा तर कारभार नसावा ना? असा सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.

रोहा विभागातील कार्यकारी अभियंता हे जनतेचा कोणताही विचार न करता विद्युत प्रवाह ५-५ तास बंद करत असून अथवा काही कारणानिमित्त गेला असल्यास नागरिकांना का सुविधा देत नाहीत. पण विद्युत वितरण कंपनीचे बिल थकीत झाल्यास ज्या तत्परतेने विद्युत प्रवाह बंद करतात त्याच तत्परतेने त्यांनी काम करणे गरजेचे आहे.

**आंधळ दळतयं आणि कुत्रं पिठं खातयं हा काय प्रकार?**

नागरिकांनी याबाबत तक्रारी करण्यास विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात गेले असता तेथे नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत जात नाही. उलट नागरिकांना सताविण्याचा प्रकार सुरू आहे. जर तक्रार घेणे आणि पोहोच देणे हे तेथील अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे, असा शासनाचा नियम आहे. आलेल्या अर्जावर आपल्याला काय उत्तर द्यायचे हे नंतर ठरविले जाते. परंतु नागरिकांच्या तक्रारींची दखल न घेणे हा कायदेशीर गुन्हा आहे. असे गुन्हेगार असलेले रोहा विभागातील कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता यांचा हेतू हाच दिसतोय की नागरिकांना वेठीस धरुन आपला खिसा भरणे, हा हेतु स्पष्ट दिसत आाहे. याचाच अर्थ असे अधिकारी आपण नेमल्यामुळे त्यामागे आपलाही काही लाच घेण्याचा हेतू असावा का? असा मतप्रवाह जनतेमधून निघत आहे. जर आपण तळा विभागातील आणि रोहा विभागातील कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता यांची उच्चस्तरिय चौकशी न केल्यास तळ्यातील नागरिक न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत आणि नागरिकांचा होणाऱ्या खर्चास आपण जबाबदार आहात.

## पनवेल तालुका पत्रकार महासंघ आणि मोरे हेल्थकेअर आयोजित आरोग्य शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकशाहीची सामाजिक बांधिलकी जपत असताना पत्रकारांचा आहार व आरोग्य सुस्थितीत कसे रहावे त्याचबरोबर पत्रकारांनी कोणती काळजी घ्यावी, या उद्देशाने पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांच्या संकल्पनेतून मोरे हेल्थकेअर आणि पनवेल तालुका पत्रकार महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच पनवेल तालुक्यातील पत्रकारांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० ते १२.३० च्या दरम्यान नवीन पनवेल येथील एस.पी.मोरे कॉलेज येथे सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित पत्रकारांचे पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांनी स्वागत केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महासंघाचे उपाध्यक्ष दीपक घोसाळकर यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, पनवेल तालुका पत्रकार महासंघाने आजवर अनेक उपक्रम राबविले आहेत, यामध्ये वृक्षारोपण, कुष्टरोगी बांधवांना खाऊचे वाटप, वृद्धाश्रमात अन्नधान्य वाटप, आदिवासी बांधवांना अन्नधान्य वाटप, जागतिक महिला दिनी कर्तुत्ववान महिलांचा यथोचित सन्मान यासारखे अनेक उपक्रम महासंघाच्या माध्यमातून राबविले आहेत.



आजच्या आरोग्य शिबिरात पत्रकारांच्या अत्यावश्यक शारीरिक तपासण्या करण्यात आल्या, यामध्ये रक्तदाब, सोप्या पद्धतीची रक्त तपासणी, ऑक्सीजन पातळी तपासणी, एकूण शारीरिक वजन आणि शारीरिक संतुलन वैद्यकीय सल्ला, शरीरातील वेगवेगळ्या .../२

## शिवसमाधीजवळ पूजा विधी करणाऱ्या चौघांना अटक; चार दिवसांची पोलीस कोठडी

**दै.रायगड नगरी । महाड**

किल्ले रायगडवरील शिवसमाधीजवळ अस्थि आणि राखेसह पूजाविधी करणाऱ्या चौघांविरुद्ध महाड तालुका पोलीस ठाण्यात धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.शनिवारी रात्री गुन्हा दाखल झाल्यानंतर या चौघांनाही पोलिसांनी रात्रीच अटक करुन आज (रविवारी) सकाळी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये इतिहास अभ्यासक आणि व्याख्याते सौरभ करडे, शैलेश वरखडे ,ओंकार घोलप, किरण जगताप (सर्व रा. पुणे) यांचा समावेश आहे. ८ डिसेंबर (बुधवार) रोजी हे चौघे रायगडवरील शिवसमाधीजवळ एका पुस्तकाचे पूजन करताना आढळून आले होते. त्यांच्याजवळ असलेल्या साहित्यात अस्थि आणि राख सदृश्य साहित्य आढळल्याने, मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक पूजा झोळे, वैशाली बेलदरे पाटील आणि प्रदीप बेलदरे पाटील यांनी हा पूजा विधी उधळून लावला. या पूजेच्या माध्यमातून शिवशाहीर स्व. बाबासाहेब पुरंदरे यांच्या अस्थि आणि रक्षा या ठिकाणी ठेवण्यात येत असल्याचा दावा त्यांनी केला होता. या प्रकाराची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी रायगडवर जावून सर्व पूजा .../२

# शासकीय सेवावृद्धीचे दुखणे

शस्त्रक्रिया पुढे ढकलणे हा जीव वाचविण्याचा पर्याय ठरू शकतो काय? राज्य सरकारने सध्या या प्रश्नावर गंभीर चिंतन करण्याची गरज आहे. वेळेवर निदान आणि उपलब्ध साधनांसह तत्पर कारवाई या वैद्यकीय पर्यायानेच आरोग्य संवर्धन शक्य आहे. शस्त्रक्रियेला दिलेली बगल अंगलट येऊ शकते. तसे झाल्याने कालबद्ध निर्णयांमुळे पडणारा आर्थिक बोजा सोसण्यापेक्षा पात्र उमेदवारांची संधी डावलल्याची टीका राज्य सरकारवर होत आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि राज्य कामगार विमा योजनेत येणाऱ्या रुग्णालयांतील वैद्यकीय तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय पूर्वी ५८ होते. फडणवीस सरकारने २०१८ मध्ये ते ६० केले. विद्यमान ठाकरे सरकारने ही सेवावृद्धी ६२ पर्यंत नेऊन ठेवली. या सततच्या सेवावृद्धीला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. उच्च न्यायालयाने ही सेवावृद्धी अयोग्य ठरवली. ताज्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयानेही सेवावृद्धीला आळा घातल्याने सरकार तोंडघशी पडले आहे. हा धक्का वैद्यकीय शिक्षण विभागालाही बसला असून नव्या नोकऱ्यांचा दबाव वाढत असताना जुन्याचे दुखणे लांबविणे कितपत योग्य आहे, अशा थेट प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. करोनाकाळाने अर्थव्यवस्थेचे कवच उद्ध्वस्त केले आहे. मंदीचा काळ वाढत चालल्याने जुन्या निवृत्ती रकमांचे 'शिवधनुष्य' पेलायचे की नाही, याबाबत राज्य सरकार संभ्रमावस्थेत आहे. त्यातूनच आरोग्य विभागातील निवृत्तीचे वय ६२ करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. परीक्षांचा काळ प्रदीर्घ करीत नेणे हे संकटांनी उभे केलेले सर्वांत मोठे आव्हान असते. या कालावधीत संयम आणि समन्वयात गफलत झाली तर फटकाही दीर्घ असतो. राज्यातही हाच पायंडा लागू करायचा ठरविला तर संभाव्य बेरोजगारीच्या अनुशेषाला हातभार लावण्याजोगी स्थिती निर्माण होईल. तो धोका तुलनेने अधिक मोठा असेल. त्याचा विचार आताच व्हायला हवा. राज्याच्या गृह, अर्थ, कृषी, सार्वजनिक आरोग्य, पशुसंवर्धन, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, महसूल आदी विभागांमधील अंदाजे अडीच लाख कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यातून सरकारी तिजोरीला मोठा आर्थिक भार सोसावा लागेल. सेवानिवृत्ती वयाच्या वाढीस अर्थ विभागाने आधीच अनुकूलता दाखविली होती. राज्याच्या या सकारात्मक संकेतांनी वादात तेल ओतले गेले. युवकांची संख्या सर्वाधिक असलेल्या आपल्या देशापुढे बेरोजगारीचे संकट मोठे आहे. अशा स्थितीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवावृद्धीने अडचणी तेवढ्या वाढतील. हाच पायंडा अन्यत्र राबवायचा ठरविल्यास ते अवघड जागेचे दुखणे ठरेल. करोनाच्या संकटामुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळली आहे. नव्या पदांची भरती पुढील वर्षभर तरी दुरापास्त दिसते आहे. मुख्य म्हणजे वरिष्ठ पदांवरील निवृत्त्या थोपविल्याने अनेकांच्या संभाव्य पदोन्नत्या अडल्या आहेत. मागील काही वर्षांत अनेक अधिकाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने सरकारच्या मूळ संकल्पनेलाच हरताळ फासला गेला. सक्षम अधिकाऱ्यांच्या सेवेचा लाभ मिळाला एवढाच हेतू निवृत्ती वय लांबविण्यामागे असता, तर हा निकष सर्व सरकारी विभागांमध्ये का लागू केला नाही, हा प्रश्न उपस्थित होतो. करोनाच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी सक्षम आरोग्यसेवक असावेत म्हणून वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवावाढ देण्याचा निर्णय घेतल्याचे मध्यंतरी राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी म्हटले होते. सरकारी रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा तुटवडा आहे, या सबबीवर मधल्या काळात जिल्हा आरोग्य अधिकारी, शासकीय शल्यविशारद आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ५८वरून ६० वर्षे करण्याचा राज्य सरकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने अवैध ठरविला. सेवावृद्धीबाबतचे २०१५चे शासननिर्णय उच्च न्यायालयाने गतवर्षी रद्द ठरविले. हा निर्णय देताना न्यायालयाने केलेल्या सूचना महत्त्वाच्या होत्या. करोनाच्या संकटामुळे शासन निर्णयाच्या लाभार्थ्यांच्या सेवांना तात्काळ धक्का लावू नये, मात्र यापुढे अशा अधिकाऱ्यांना सेवा मुदतवाढ देऊ नये, असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने राज्याला दिले होते. सार्वजनिक आरोग्य विभाग व सरकारी रुग्णालयांतील रिक्त पदे भरण्यासाठी २०१५पासून गांभीर्याने प्रयत्न न केल्याबद्दल न्यायालयाने सरकारचे कान टोचले होते. मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त ठेवण्याची चूक सरकारने केली असताना सेवावृद्धी अयोग्य ठरते, असे मत या खटल्यात न्यायालयाने नोंदविले होते. सर्वोच्च न्यायालयानेही तोच निर्णय कायम ठेवल्याने सरकारच असहाय झाले आहे. आजवर पदोन्नतीपासून वंचित ठरलेल्या अधिकाऱ्यांना न्याय मिळाला आहे. शासकीय निर्णयानुसार ज्यांना सेवावृद्धीचा लाभ झाला, त्यांचे आता काय करायचे या प्रश्नाची शस्त्रक्रिया सरकारला आता करावी लागेल. मुळात सरकार अशी कुठवर सेवा लांबवित नेणार आहे? सेवावृद्धीतून संकट लांबविण्याच्या प्रक्रियेला तेवढे बळ मिळेल. पात्र उमेदवारांच्या कालबद्ध पदोन्नतीकडे शासन निर्णयाच्या नावाखाली दुर्लक्ष करता येणार नाही, हा धडा सेवावृद्धी प्रकरणाने दिला आहे.

# तळा नगरपंचायत बिनविरोधच्या अडचणीत वाढ ; ग्रामस्थांच्या भूमिकेला तडा

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत निवडणुकीत भोईर वाडी प्रभाग क्रमांक १५ मध्ये सर्वसाधारण महिला या जागेसाठी बिनविरोध निवडून आणण्यासाठी ग्रामस्थांचे एकमत झाले होते या जागेसाठी भोईर वाडीचे सुपुत्र नगरपंचायतीचे विरोधी पक्ष नेते चंद्रकांत भोरावकार यांच्या पत्नी सौ.अस्मिता भोरावकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे उमेदवारी देण्यात आली मात्र ऐनवेळी शिवसेने कडून उमेदवारी अर्ज आल्याने तळा नगरपंचायतीचे विरोधी पक्ष नेते राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्रकांत भोरवकर यांना आता निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे.

प्रभाग क्रं– ४ वरचा मोहल्लामध्ये सर्वसाधारण आरक्षण पडले आहे याठिकाणी सर्व मुस्लिम बांधवांनी ही निवडणूक कुठल्याही पक्षाच्या चिन्हावर न लढता अपक्ष म्हणून लढण्याचे ठरविण्यात आले गावकीचा उमेदवार म्हणून सर्वांनी सिराज खाचे यांना उमेदवारी दिली परंतु येथे देखील बंडखोरी करण्यात आली अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अर्ज भरण्यात आलेले आहेत. या बंडखोरीला राष्ट्रवादी काँग्रेसचा छुपा पाठिंबा असल्याचे बोलले जात आहे. या सर्व घडामोडींमुळे ज्या प्रभागात शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवारांचे बिनविरोध निकाल लागणार होते त्या ठिकाणी दोन्ही पक्षांनी एकमेकांना अडचणीत आणले आहे. या सर्व घडामोडींमुळे निवडणूक बिनविरोध करण्यासाठी पुढाकार घेतलेल्या ग्रामस्थांचा मात्र हिरमोड झाला असून राजकीय वातावरण तापले आहे. राजकीय सलोखा कायम राहावा, श्रम, वेळ आणि पैसा खर्च होऊ नये आणि तालुक्यात एक वेगळा आदर्श निर्माण व्हावा, म्हणून निवडणूक न लढता बिनविरोध निवडणूक करण्याची संकल्पना ग्रामस्थांनी मांडली होती. त्यास सहमती देखील मिळाली होती. परंतु अचानक बंडखोरी होऊन उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने ग्रामस्थांच्या बिनविरोध भूमिकेला तडा गेला आहे.

प्रभाग क्रमांक ४ आणि प्रभाग क्रमांक १५ मध्ये उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यास तालुक्यात घडलेल्या या राजकीय घडामोडींमुळे समाज माध्यमातून उलटसुलट चर्चांना उधाण आले असून या घटनेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील वाद आता अधिक ताणला जाणार आहे.त्यामुळे उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी काही काळ तणावही निर्माण होऊ शकतो. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने प्रभाग क्रमांक १५ आणि प्रभाग क्रमांक ४ मधील पुरस्कृत अपक्ष उमेदवाराचे अर्ज मागे घेऊन एकमेकांना सहकार्य करावे असा सुर चर्चे तून एकायला येत असून यासंदर्भातील निर्णय येणाऱ्या १३ तारखेलाच कळेल. प्रभाग क्रं– ७ जोगवाडी सर्वसाधारण जागेवरून ग्रामस्थांनी दिलेला शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार मंगेश पोलेकर याची बिनविरोध निवड झाल्यात जमा असून येथे कोणीही बंडखोरी केलेली नाही त्यामुळे ग्रामस्थांनी घेतलेल्या निर्णयाला यश आले आहे.

प्रभाग क्रमांक ९ मध्ये शिवसेना पक्षाने घेतलेली हरकत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी फेटाळल्यानंतर शिवसेनेकडून माणगाव सत्र न्यायालयात अपील केलेले नाही त्यामुळे येथे राष्ट्रवादी काँगेस उमेदवाराचा अर्ज वैद्य झाला असल्याने राष्ट्रवादी काँगेसने सुटकेचा श्वास सोडला आहे येथे शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये लढत होणार असून कोण बाजी मारणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. अर्ज मागे घेण्याच्या दिवशी कोण कोण माघार घेणार याकडे उमेदवाराचा निकाल अवलंबून असून प्रत्येक प्रभागातील चित्र स्पष्ट होणार आहे.

# खोपोलीकरांसाठी सिटी बस सुरू न केल्यास काँग्रेस पार्टीने दिला नगर परिषदेला आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । खोपोली**



कोरोना संकट कमी होऊनही खोपोली परिवहन विभागाअंतर्गत असलेली सिटी बस सेवा अद्याप बंद आहे. ही सेवा नियमितपणे सुरू व्हावी यासाठी शहरातील विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी, पालक व शहर काँग्रेसकडून सतत पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र, नगरपालिका प्रशासन व परिवहन सभापती यांच्या वारंवार आश्वासनानंतरही ही सेवा सुरू न झाल्याने खोपोली शहर काँग्रेसच्या माध्यमातून नगर परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. काँग्रेस शहराध्यक्ष रिचर्ड जॉन यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी दि.१३ डिसेंबर रोजी धरणे आंदोलन होणार आहे.

याबाबत निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खोपोली नगर परिषदेच्या सिटी बसेस चालविण्यासाठी नगरपरिषदेने सुधीर रोडलाईन्स यांना १० वर्षे मुदतीने चालविण्यास टेंडरनुसार दिले आहे, त्याची मुदत अजून संपलेली नाही. कोवीड काळात सदर परिवहन सेवा बंद करण्यात आली होती. परंतु आता सर्व व्यवहार, शाळा, कॉलेज इतर उदयोग चालू झाल्याने कामावर जाणारे कामगार, विद्यार्थी, प्रवाशांचे विशेषतः महिलांचे अत्यंत हाल होत आहेत. गेले अनेक महिने सिटी बसेस सेवा बंद आहे. ठेकेदार सुधिर रोड लाईन्स जाणूनबुजून सिटी बस सेवा बंद ठेवून नागरीकांना वेठीस धरत आहेत. तरी सिटी बस सेवा लवकरात लवकर सुरु न केल्यास खोपोली शहर काँग्रेसच्या वतीने नगर परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा काँग्रेस शहराध्यक्ष रिचर्ड जॉन यांनी दिला आहे.

# पेझारी येथे महिला व किशोर गट कबड्डीचा थरार

**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोनाचे प्रादुर्भावावामुले गेले दिड वर्ष रायगडातील कबड्डीचा दम थांबला होता तो आता पुन्हा घुमणार आहेरायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन च्या विद्यमानाने किशोर गट व महिला गट स्पर्धेचे आयोजन भैरवनाथ क्रिडा मंडळ पेझारी येथे रविवार दिनांक १२ डिसेबंर रोजी करण्यात आले असुन रायगडात कबड्डीचा दम घुमणार आहे.गेली अनेक वर्षे रायगड जिल्हा निवड चाचणी अजिंक्यपद स्पर्धा सातत्याने सुरू होती परंतु कोरोनाचे प्रादुर्भावामुले गेल्या वर्षी ही स्पर्धा होवु शकली नाही परंतु या वर्षी ही स्पर्धा होणार असल्याने खेळांडुमध्ये उत्साहाचे वाता–वरण आहे तर कबड्डी रसिकांना देखिल ब–यांच काळखंडानंतर कबड्डीचा थरार प्रत्यक्ष पाहायला मिळणार आहे.

सदर स्पर्धा वर्षानुवर्षे चालू आहे ,काही वर्षांपूर्वी सदर स्पर्धेवर काही संघाची मक्तेदारी होती ,परंतु जसा कबड्डी खेळ मातीवरून मॅट वर आला तशी नियमावली मध्ये बदल होत गेला आणि तेव्हा पासून अजिंक्यपद चाचणी स्पर्धे मधील मक्तेदारी मोडीत काढीत नवीन नवीन संघ विजतेपद पटकावू लागले व सदर स्पर्धेला आणखी महत्व प्राप्त झाले आणि खेळला आणखीन रंगत आली. रायगड जिल्ह्यातील सर्वात जास्त कबड्डी ही अलिबाग आणि पेण तालुक्यात खेळली जाते त्याच प्रमाणे आता रोहा कर्जत सुधागड तालुक्याही खेळला जातो परंतु पेण, अलिबाग तालुक्यातील काही संघाची पक्कड अजिंक्यपद स्पर्धेवर होती ,आणि ते असणं साहजिकच आहे कारण त्याच्याामध्ये असलेली सांघिक भावना नियमित सराव आणि मेहनत आहे. रायगडाती महिला कबड्डीमध्ये ना.ना. पाटील हायस्कुल पोयनाड, माध्यमिक शाळा शिहु, दिलखुष आवास, टाकादेवी मांडवा या संघानी सुरवातीला आपली मक्तेदारी ठेवली होती तर अलिकडच्या काळात कर्नाळा स्पोर्टस पनवेल, राजमाता जिजाऊ कंळबोली हे संघ हे वरचढ होताना दिसत आहेत तर महिला संघ घडविण्यामध्ये जे. जे. पाटील,जनार्दन पाटील,चंदु पाटील,सुर्यकांत ठाकुर संदेश वर्तक यांचा मोलाचा वाटा आहे, तर रायगड जिल्ह्याने ऋणाली मोकल, रंजना पाटील, अंकिता पाटील, नितु पाटील,सुकन्या समजिस्कर ,भार्गवी माने, वैशाली पाटील, नमिशा पाटील, मोनाली घोंगे, तेजा सकपाळ रचना पाटील आदि विविध गटातील राष्ट्रीय खेळांडु महाराष्ट्राला दिल्या आहेत.

महिला संघामध्ये, दिलखुष आवास, प्रतिज्ञा बांधण, टांकादेवी मांडवा, कर्नाळा स्प–ोर्ट ॲकडमी पनवेल, शिवतेज पेण, दत्तात्रेय पनवेल, राजमातााजिजाऊ कळंबोळी ,हिरकणी गडब, शिवशंभो पाटणेश्र्वर, मिडास स्पोर्ट उरण, राजमाता जिजाअऊ कंळबोळी ओम साई कळवे आदी संघ जिल्हा अंजिक्यपद स्पर्धेत उतरणार आहेत महिलामध्ये , भार्गवी माने, मोनाली घोंगे, अनिता पाटील, तेजा सकपाळ, रश्मी पाटील,हर्षली नाखवा, ज्योती राऊत, प्रगती पाटील, स्वाती पाटील, पुजा पाटील आदि मातब्बर महिला खेळांडु आपआपल्या संघातुन खेळणार आहेत. तर या मिडास स्पोर्ट उरण, दिलखुष आवास , टाकादेवी मांडवा, कर्नाळा स्पोर्ट पनवेल, राजमाता जिजाऊ कळंबली या संघाचे आव्हान असणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्वच कबड्डी संघ कसुन सराव करीत असल्याने मातब्बर खेळांडुपुढे नवोदित खेळांडुचे आव्हान आसणार आहे. तर किशोर गटाच्या स्पर्धेत नवोदित खेळांडु आपले कसब पणाला लावणार आहेत

# राष्ट्रभक्त बशीर हजवानींचे समाज सेवेचे कार्य अलौकीक : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । महाड**

परदेशात राहूनही आपली देशभक्ती व मातृभक्ती मनात ठेवून सामाजिक कार्य करणाऱ्या राष्ट्रभक्त बशीर हजवानी यांचे कार्य अलौकीक असल्याचे गौरवोदगार रायगड लोकसभेचे खासदार सुनिल तटकरे यांनी महाड मध्ये काढले.

बशीर एम.हजवानी फाऊंडेशनच्या वतीने अत्याधुनिक सात रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा आज महाडमधील डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात रायगडचे खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, महाडचे आ. भरतशेठ गोगावले, दापोलीचे आ. योगेश कदम, महाडच्या नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. यावेळी खासदार तटकरे बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा बशीर एम हजवानी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बशीर हजवानी, अली कौचाली, इकबाल चांदले, अकबर तरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी खा. तटकरे यांनी बशीर हजवानी हे आर्थिक नव्हे तर मनानेही श्रीमंत आहेत. ज्या संस्थांना या रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या आहेत त्यांनी त्यांचा विनियोग चांगल्या पद्धतीने करावा असा सल्ला दिला. ही रुग्णवाहिका ही जनतेच्या आरोग्याची व बशीर हजवानी यांच्या दातृत्वाची चावी आहे असे तटकरेंनी सांगितले. महापुराचे काळात मुस्लिम समाजाकडून कोणताही भेदभाव जात पात धर्म न पाहता जी मदत केली ती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणाऱ्या सेक्युलॅरिझमचे प्रतिक आहे असे सांगत बशीर हजवानी यांच्या कार्याचा उचित गौरव राज्य सरकार कडून करण्याची मागणी सर्व लोकप्रतिनिधींमार्फत करण्यात येईल असे तटकरे यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आपल्यालाच उपाय शोधायचा आहे: शरद पवार

या कार्यक्रमातून पुढील कामासाठी ऊर्जा मिळाली, या शब्दांत शरद पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस हा पर्याय असेल अशी बांधणी करायची आहे. समाजावर जे अन्याय अत्याचार झाले त्याची जाणीव राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना हवी. अस्वस्थ माणसांशी समरस होणार कार्यकर्ता व्हायला हवा. देशासमोर आणि सामान्य माणसासमोर असंख्य प्रश्न, समस्या आहेत आणि आपल्यालाच त्याचा उपाय शोधायचा आहे. आपल्यालाच प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यायचा आहे, असे आवाहन शरद पवार यांनी यावेळी केली. तसेच समाजातील उपेक्षित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. या अधिकारासाठी त्यांचा संघर्ष सुरू आहे. तो अधिकार त्यांना मिळायला हवा. त्यासाठी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न करायला हवा, अशी आशा शरद पवार यांनी व्यक्त केली.

दरम्यान, समाजातील उपेक्षित वर्गावर जे अत्याचार अन्याय केले. त्याची अस्वस्थता त्यांच्या मनात आहे. ती दूर करण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्नांची परिकाष्टा करण्याची गरज आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता हे सर्व ऐकल्यावर अस्वस्थ झाला तर तो खरा कार्यकर्ता आहे, असेही शरद पवार यांनी म्हटले आहे.

## माथेरानचे भाजपवासी नगरसेवक अखेर सेनेच्या स्वगृही परतले

ह्या तिन्ही नगरसेवकांनी पुन्हा एकदा आपल्या स्वगृही अर्थातच शिवसेनेचे दायित्व स्वीकारले आहे. यापुढेही टप्प्याटप्प्याने अन्य भाजपवासी नगरसेवक सुद्धा स्वगृही येण्याच्या मार्गावर असणार आहेत. या पुनरप्रवेशासाठी मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन शिवसेनेचे नेते मंत्री सुभाष देसाई,अनिल देसाई, खासदार अप्पा बारणे, युवा सेना सचिव वरूण देसाई, शिवसेना सचिव सुरज चव्हाण यांची विशेष मदत मिळाली असे प्रसाद सावंत यांनी सांगितले.

## आरोग्य शिबिर संपन्न

रक्त घटकांची तपासणी या व इतर तपासण्या करण्यात आल्या, तसेच निरोगी आरोग्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून उपस्थित पत्रकारांना माहिती देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे जेष्ठ सल्लागार तथा दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर, रायगड शिव सम्राटचे संपादक तथा पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील, उपाध्यक्ष तथा दैनिक पुढारीचे प्रतिनिधी दीपक घोसाळकर, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी तथा सचिव मयूर तांबडे, खजिनदार तथा आर्या प्रहरचे संपादक सुधीर पाटील, वतन कर्नाळाचे संपादक भालचंद्र जुमलेदार, रसायनी टाइम्सचे संपादक अनिल भोळे, पनवेल वैभवचे संपादक अनिल कुरघोडे, दैनिक किल्ले रायगडचे प्रतिनिधी प्रदिप वालेकर, रायगड शिव सम्राटचे प्रतिनिधी सुभाष वाघपंजे, वतन कर्नाळाचे प्रतिनिधी शेखर भोपी त्याचबरोबर मोरे हेल्थ केअरचे क्लिनिक मॅनेजर आर्यन शेळके, डॉ. प्रिया भट्टाचार्य, डॉ. सिद्धी देवळेकर, प्रशासकीय अधिकारी अनिल मखामले, नर्सिंग कर्मचारी सुजाता आठवाल, संघमित्रा हिवाळे, सुचिता सुतार, कार्यालयीन प्रतिनिधी जान्हवी लोखंडे, बाळाराम पारधी यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी पनवेल जेष्ठ पत्रकार घनश्याम मानकामे, विक्रम बाबर, मनोहर सचदेव, राजू गाडे, अविनाश जगधने, अनिल रॉय, प्रथमेश रेवाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## शिवसमाधीजवळ पूजा विधी करणाऱ्या चौघांना अटक

साहित्यासह सौरभ करडे आणि त्यांच्या साथिदारांना तालुका पोलीस ठाण्यात आणले.

शनिवारी (११ डिसेंबर ) पूजा झोळे यांनी महाड तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार सौरभ करडे,शैलेश वरखडे ,ओंकार घोलप, किरण जगताप या चौघांविरुद्ध धामिक भावना दुखावल्याप्रकरणी भा.दं.वि. कलम २९५, ३४, १५३ ए, १५३ ए (१ ) (ए ) १५३ ए (१ ) (बी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर रात्रीच त्यांना अटक करण्यात आली. आज (रविवारी ) त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. या प्रकरणी अधिक तपास उपविभागिय पोलीस अधिकारी निलेश तांबे करित आहेत.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**



विद्याप्रसारणी सभा चौक सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक यांचा २०२० व २१ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक व उच्चमाध्यमिक परिक्षेत विशेष प्राविण्याने उतीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांची उपस्थिती होती.

उपमुख्यध्यापिका पुजारी मॅडम यांनी प्रास्ताविकात शैक्षणिक प्रगतीची माहिती देवून प्रामुख्याने कोरोना काळात विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबाबत संस्थेनी केलेल्या कार्याची सविस्तर माहिती दिली. इयत्ता ५ वी ते ९ वी व ११ वी मध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात विद्यार्थीनीने यश संपादन केल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी संस्थेच्या कार्याध्यक्षा सौ. शोभाताई देशमुख, नरेंद्र शहा, योगेंद्र शहा, संचालक बिपीन शहा, संचालिका गायकवाड मॅडम, धनंजय देशमुख यांच्यासह पालक, शिक्षकवर्ग यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात माधव पाटील यांनी देशमुख कुटुंबियांच्या योगदानाचे कौतुक करुन तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याचा व मागील पिढीचा संबंध असल्याचे सांगून राजकीय नाही तर शैक्षणिक क्षेत्रात संस्था करीत असलेल्या कार्याला मनापासून शुभेच्छा दिल्या.

ॲड. अविनाश देशमुख यांनी आपल्या भाषणात आपल्या सहकारी व शिक्षक वर्गाच्या सहकार्याबाबत आभार व्यक्त करुन संस्थेने केलेल्या चांगल्या कामाची पावती म्हणजे विद्यार्थ्यांचे सुयश असल्याचे सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येत आहे की आमचे अशील श्री. सुनील लहू जुवाटकर सध्या राहणार कामोठे कार्यालय : सत्यवान आर्केड, गाळा न. १८, प्लॉट न. १६., सेक्टर १५, कामोठे, नवीन मुंबई यांची खालील वर्णनाची मिळकत मी १३ जून २०१३ रोजी त्यानी अॅड. सौ. मीरा प्रमोद ठाकूर यानां विकलेली आहे. सदर मिळकतीच्या विद्रयमान मालकीण अॅड. सौ. मीरा प्रमोद ठाकूर असून त्यानी कायमस्वरूपी सदर मिळकत विकत घेतलेली असून ती पनवेल दुय्यम सह- निर्बंधक क्र. ५ येथे नोंदणी दस्त क्र. ३००७/२०१३ दिनांक १३ जून २०१३ रोजी नोंदविलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

अगोदरचे मालक : श्री. सुनील लहू जुवाटकर
सध्याचे ची मालक मालकीण : अॅड. सौ. मीरा प्रमोद ठाकूर
जागेचे वर्णन : 'ए' वींग सदनिका क्र. ००३,
बालाजी शरण को.हौ. सो. लि., सर्व्हे क्र. १४२, हिस्सा क ३ बी, आदई गाव, नवीन पनवेल ४१० २०६.

सदर मिळकतीचे 'मूळ दस्ताऐवज' हे मे. महादीप रियल्टी प्र. लि. च्या बिल्डरकडून प्रथम मालक श्री. मसू जगन्नाथ माने यांच्या नावे दि. १४.०२.२००६ रोजी दस्त क्र. १०४१/२००६ याना विकली गेली. त्यानंतर श्री. माने वेळेवर हफ्ते भरू शकले नाही म्हणून त्यांच्या बँकेने म्हणजे देना बँक दादर ( प ) यानी दिनांक ०८.०५.२००९ रोजी सदर मिळकत श्री. अवतार सिंग यानां सेल सर्टीफीकेट ने विकली व त्याचे दस्त नोंदणी क१. २०४७ / २००९ असे आहे. त्यानंतर माझ्या अशीलानी सदर मिळकत श्री अवतारसिंग यांच्याकडून दिनांक ११.३.२०११ रोजी दस्त क्र. ३६२६/२०११ नुसार खरेदी केली. त्यानंतर त्यानी सदर मिळकत अॅड. सौ. मीरा प्रमोद ठाकूर यांना दिनांक १३.०६.२०१३ रोजी दस्त क्र. ३००७ २०१३ नुसार पूर्ण मोबदला घेवून विकलेली आहे व आज रोजी माझ्या अशीलांचा सदर मिळकतीवर कोणताही अधिकार वा हक्क राहीलेला नाही.

परंतु २०११ मध्येच माझ्या अशीलांकडून प्रवासात सदर मिळकतीचे वरील प्रमाणे मूळ दस्त क्र. १०४१/२००६ व दस्त क्र. २०४७ / २००९ हे गहाळ झालेले होते व त्याविषयी खांदेश्वर पोलीस ठाण्यात त्यानी जाहीर नोटीस देवून तक्रार नोंदवली होती. मात्र सौ. ठाकूर यांना त्यानी याची कोणतीच माहिती दिली नव्हती व त्याशिवाय त्यानी वरीलप्रमाणे खरेदी विक्रीचा व्यवहार नोंदवला. त्यानंतर वरील बालाजी शरण इमारतीमधील रहिवाश्यानी सोसायटी रजिस्ट्रेशन केले व म्हणून सौ. ठाकूर यानी माझ्या अशीलांकडे मूळ दस्तांची मागणी केली. यांच्या विनंतीनुसार माझ्या अशील- ानी त्यानां Indemnity Bond बनवून दिला परंतु सदर जाहिरातीची प्रत त्यासोबत लावली नाही व आता यास खूप विलंब झाल्यामुळे सदर जाहीर नोटीसची जाहिरात उपलब्ध होत नाही व म्हणूनच ही जाहीर नोटीस.

सदर मिळकतीचा कोणताही भाग माझ्या अशीलानी सौ. मीरा प्रमोद ठाकूर यांच्या शिवाय आजपर्यंत कोणासही विक्री, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, व्याज, पोटगी, बक्षीस वा अन्य कोणत्याही हेतूने कोणासही हस्तांतरीत केलेला नाही व त्यानां सदर मिळकत विकण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहेत. तरीही सदर मिळकतीत कोणाचेही हितसंबध वा हक्क असल्यास त्या व्यक्तिने तशी संबधित हरकत अथवा तक्रार नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर ७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य ती कागदपत्रै पुराव्यासहीत सादर करावीत.

वरील मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकतीचे मूळ वरीलप्रमाणे गहाळ झालेले दस्त हे खरोखरच अस्तित्वात नाहीत व सदर मिळकत पूर्णपणे निर्बंध आहे असेच गृहित धरले जाईल व मागाहून कोणाचीही हरकत अथवा तक्रार आल्यास ती विचारांत घेतली जाणार नाही याची हे सर्वांस कळावे.

**सही /-**
**अॅड. सौ. सुलक्षणा जगदाळे**
**ग्लोबल्स असोशिएटस, गाळा न. ८**
**प्लॉट न. २७, सेक्टर २०, गुरूदेव**
**सोसायटी कामोठे, नवी मुंबई**
**मोबाईल ९८६७२६७८९५**

---

मा.गोडसे मॅडम कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
अॅड.सौ.वर्षा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६७८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/०१/२०२२

१) श्रीमती.सुरेखा रवींद्र पाटील (पत्नी)
वय : २४ वर्षे, धंदा : काही नाही
२) श्री.अतुल रवींद्र पाटील (मुलगा)
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
क्र.१ व २ दोघे रा.घर नं.८२ ब, सेक्टर १३,
खारघर गाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०
३) सौ.आतिषा आदिनाथ जोशी (मुलगी)
वय : २० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.१७१, गावदेवी मंदिराजवळ, सेक्टर ३१,
ओवे पेठ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० अर्जदार

ज्याअर्थी कै.रवींद्र कमळ पाटील हे दि.१८/०७/२०१९ रोजी अपोलो हॉस्पिटल, सिबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.रवींद्र कमळ पाटील यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असले बाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.रवींद्र कमळ पाटील हे पनवेल महानगरपालिका यांचेकडे नोकरीस होते व त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे वारसापैकी एका वारसास अनुकंपा तत्वावर मासिक निर्वाह भत्ता / नोकरी मिळते म्हणून सदर अर्जदार श्रीमती.सुरेखा रवींद्र पाटील यांनी त्यांचेकडे अर्ज केल्यावर त्यांनी त्यांचे पत्र जा.क्र.पमपा/आस्था/२५२१/प्र.क्र.३२/९३१/२१ दिनांक २/९/२०२१ अन्वये अनुकंपा तत्वावर मासिक निर्वाह भत्ता / नोकरी मिळण्यासाठी सक्षम न्यायालयाने दिलेला वारस दाखला सदर करण्याचे सांगितले आहे.

सबब वरील अर्जदार हे मयत कै.रवींद्र कमळ पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणतेही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करेल आणि ते जर कै.रवींद्र कमळ पाटील यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.६/१२/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**क.लिपीक**<br>**दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-**<br>**सहा.अधिक्षक**<br>**दि.न्या.व.स्तर, पनवेल** |

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.तेजस पद्माकर भोवर आणि श्वेता तेजस भोवर रा.रुम नं.३०४, परिजात को.ऑप.सोसा लि., के.एच-२/३०, प्लॉट नं.२, सेक्टर १६, खारघर मुंबई यांनी खालील वर्णनाची मिळकत श्री.पंकज भिमराव सोमनाथे यांचेकडून विकत घेतली होती. आणि श्री.पंकज भिमराव सोमनाथे यांनी सदर मिळकत श्री.नसिम खान यांचेकडून विकत घेतली होती आणि नसिम खान यांनी सदर मिळकत ज्ञानेश्वर विठ्ठल भोसले यांचेकडून विकत घेतली होती. त्यामुळे वाटप पत्र हे ज्ञानेश्वर विठ्ठल भोसले ह्यांच्या नावे होते. खालील नमूद मिळकतीचे वाटप पत्र दि.12/01/2009, Ref No. 20005582/ 90017305 and Customer No.16463 रोजीचे मुळ वाटप पत्र आमचे अशिल यांचेकडून गहाळ झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**रुम नं.३०४, परिजात को.ऑप.सोसा.लि., के.एच-२/३०, प्लॉट नं.२, सेक्टर १६, खारघर मुंबई, जि.रायगड**

त्या संदर्भात आमचे अशिलांनी खारघर येथे दि.११/१२/२०२१ रोजी तक्रार केली आहे. त्याचा तक्रार क्र.२२९४/२०२१ असा आहे.

तरी याबाबत कोणाही व्यक्तीस वरील कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रासहीत समक्ष भेटावे.
दि.११/१२/२०२१

**सही/-**
**अॅड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सेक्टर १ ए, सीबीडी बेलापूर**

---

# श्रीवर्धन मनसे कडून स्वच्छता चळवळ ; श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर समुद्रकिनारी स्वच्छता



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे तालुक्यातील प्रमुख समुद्रकिनारी शनिवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

निसर्गसौंदर्याने पर्यटन वाढीस आलेल्या श्रीवर्धन, दिवेआगर व हरिहरेश्वर समुद्रकिनारी अस्वच्छतेचा आपल्या पर्यावरणावर कोणताही विपरीत परीणाम होऊ नये याचा विचार करण्यात आला. समुद्रकिना-यावर होणारा प्लास्टिक व ईतर कचरा त्यामुळे होणारी अस्वच्छता हे पर्यावरणासाठी धोकादायक बाब ठरत असल्याने मनसेकडून स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. श्रीवर्धन येथील संकेत भाटकर, रोहन अडमकर, हरीहर-श्वरचे अनिरुध्द गुरव व दिवेआगर प्रतिनिधी सुमित सावंत या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेला सुरुवात झाली.

नुकताच दिवाळी पर्यटन हंगाम ओसरत असून पुढे येणाऱ्या नववर्षाच्या स्वागतासाठी येथे मोठ्या प्रमाणात पर्यटकांची रेलचेल सुरू राहणार. श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर, श्रीवर्धन व दिवेआगर समुद्रकिनारा येथे येणाऱ्या पर्यटकांचे सर्वात मोठे आकर्षण आहे. विस्तीर्ण समुद्रकिनारा हा पर्यटनाच्या दृष्टीने नैसर्गिक वरदान असलं तरी या किनार्याचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपली सामाजिक बांधिलकी असल्याचे येथील कार्यकर्ते सांगतात. पर्यटकांची रेलचेल सुरूच आहे.

अधिक समुद्राच्या लाटांसोबत येणाऱ्या प्लास्टिकच्या रंगबेरंगी पिशव्या, कागदाचे तुकडे, टाकाऊ वस्तू याचे भविष्यात आरोग्यावर तसेच पर्यटनावर दुष्परिणाम होऊ नये या उद्देशाने श्रीवर्धन मनसेकडून जीवनात सामाजिक कर्तुत्व निभावण्याचे काम केले जात आहे.

प्लास्टिक हे पर्यावरणावर विघ-ातक परिणाम करत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा -हास थांबवण्यासाठी प्रत्येक किनाऱ्यावरील ३० किलो पेक्षा अधिक कचरा जमा करण्यात आला. या उपक्रमात अंदाजे १०० किलो कचऱ्याची विल्हेवाट लावून श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारे प्लास्टिक मुक्त करण्यात आले. यामध्ये विशेष श्रीवर्धन , म्हसळा, रोहा, माणगाव इत्यादी तालुक्यातून मनसे पदाधिकारीसह दिवेआगर येथील वि.गो. लिमये विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

# उत्सव चौक प्रकाशात; शिल्प चौक अंधारात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'सिडको'ने खारघर मध्ये उभारलेल्या उत्सव चौकाची रंगरंगोटी करुन रंगीबेरंगी एलईडी दिव्यांनी उत्सव चौक प्रकाशमय केला आहे. मात्र, उत्सव चौकात अंधार पसरल्याने खारघर मधील नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

'सिडको'ने खारघर शहर निर्माण केल्यावर प्रथम सेक्टर-२० मध्ये शिल्प चौक तर खारघर सेक्टर-४ मध्ये उत्सव चौक उभारला आहे. या दोन्ही चौकात कारंजे उभारण्यात आले आहे. 'सिडको'ने 'उत्सव चौक'च्या दोन्ही बाजूला कठडे आणि हिरवळची सोय केली आहे. 'सिडको'ने खारघर सेक्टर-२० मध्ये उभारलेल्या शिल्प चौक मध्ये नागरिकांची वर्दळ असते. या चौकाच्या चारही बाजूने रस्ते, दोन्ही बाजूला उद्यान, बस थांबा, बँका आणि विविध प्रकारची दुकाने असल्यामुळे नागरिकांची वर्दख असते. मात्र, गजबजलेल्या 'शिल्प चौक'ची दुरवस्था झाली असून, विद्युत दिवे तसेच कारंजे अनेक दिवसांपासून बंद आहे. एकीकडे 'सिडको'ने हजारो रुपये खर्च करुन 'उत्सव चौक'ची रंगरंगोटी करुन उत्सव चौक रंगीबेरंगी एलईडी दिव्यांनी प्रकाशमय केला आहे. मात्र, दुसरीकडे 'शिल्प चौक'वर अंधार पसरला आहे. गुगलवर खारघर सर्च करताच उत्सव चौक, शिल्प चौक यांची माहिती नजरेस पडते. 'सिडको'ने 'उत्सव चौक'ची रंगरंगोटी करुन रंगीबेरंगी एलईडी दिव्यांनी उत्सव चौक प्रकाशमय केला आहे. मात्र, 'शिल्प चौक'कडे दुर्लक्ष केल्यामुळे 'सिडको'च्या दुटप्पी भूमिकेमुळे खारघर मधील नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

# श्री साई सेवक मित्रमंडळाचा नागोठणे ते शिर्डी पदयात्रा पालखी सोहळा सुरु

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील श्री साईबाबा भक्तांकडून काही वर्षांपूर्वी श्री साई सेवक मित्र मंडळ स्थापन स्थापन करण्यात आले आहे. याच मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १० व्या नागोठणे ते शिर्डी पालखी पदयात्रा सोहळ्याला आज सकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता, व्याघ्रेश्वर व भैरवनाथ महाराजांचे दर्शन घेऊन श्री जोगेश्वरी माता मंदिरापासून सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरुवात झाली. त्यानंतर ही पालखी येथील गवळ आळी भागांत असलेल्या श्री राधाकृष्ण, साई मंदिरात दर्शनासाठी नेण्यात आली. तेथे साई मंदिर देवस्थानचे अध्यक्ष विलास चौलकर व देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी पालखीचे आणि श्री साई सेवक मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, मधुकर चौलकर, पांडुरंग चौलकर, दिनेश घाग, प्रसाद जोगत, रवींद्र वाजे, शेखर जोगत, दिनेश वादळ, नितीन घाग आदींसह श्री साई सेवक मित्रमंडळाचे पदाधिकारी व गवळआळीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

# रेल्वे मार्गावरील कॉपर केबलची चोरी; लोकलसेवा विस्कळीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने हार्बर रेल्वे मार्गावरील सीबीडी- खारघर रेल्वे स्टेशन दरम्यान असलेली ३ मीटरची कॉपर केबल कापून चोरुन नेल्याने रेल्वेच्या सिग्नलमध्ये बिघाड होऊन पनवेलच्या दिशेने जाणारी लोकलसेवा विस्कळीत झाल्याची घटना नुकतीच घडली. त्यामुळे पनवेल रेल्वे पोलिसांनी रेल्वे रुळा-लगत असलेली कॉपर केबल चोरुन नेणाऱ्या अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

सीएसएमटी-पनवेल लोकल सीबीडी-बेलापूर रेल्वे स्थानकात आल्यानंतर सदरची लोकल फलाट व्रं.१ वर बराच वेळ थांबली. त्यामुळे रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी तपासणी केली असता, बेलापूर ते खारघर रेल्वे स्टेशन दरम्यान पॉईंट नं.१०८ जवळ कॉपर केबल चोरी झाल्यामुळे पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्याचे आढळून आले. त्यामुळे रेल्वे पोलिसांनी रेल्वे रुळाजवळ जाऊन शोध घेतला असता, अज्ञात चोरट्याने तेथे असलेली ३ मीटरची कॉपर केबल चोरुन नेल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर मार्गावरील सिग्नल यंत्रणा बिघडून पनवेलच्या दिशेने जाणारी वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यामुळे पनवेल रेल्वे पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

---

अर्जदारातर्फे वकील
अॅड.वर्षा पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग दंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.१२८६/२०२१

श्री.विष्णू पांडुरंग पाटील
वय : वर्षे, धंदा : शेती
रा.मु.वलप, पो.पडघे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वलप
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.आनंदीबाई पांडुरंग पाटील हे मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी होते व ते दि.१३/०७/१९९५ रोजी मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत पावले आहेत. त्यांच्या मृत्यूची नोंद संबंधित ग्रुप ग्रामपंचायत वलप यांच्या कार्यालयामध्ये अनावधानाने राहून गेली आहे.

त्याअर्थी अर्जदार यांनी मयत कै.आनंदीबाई पांडुरंग पाटील यांच्या मृत्यूची नोंद होवून तसा मृत्यूचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार यांनी मयत कै.आनंदीबाई पांडुरंग पाटील यांचे मृत्यूचा दाखला मिळण्याचे आदेश होण्याबाबत केलेल्या अर्जास कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात आठ दिवसाच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जावर पुरावा घेवून त्यास मयत कै.आनंदीबाई पांडुरंग पाटील यांचे मृत्यूचा दाखला मिळण्याचे आदेश पारीत करील याची दखल घ्यावी.

आज दि.८/१२/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

| | | |
|---|---|---|
| **सही/-**<br>**क.लिपीक**<br>**दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-**<br>**सहा.अधिक्षक**<br>**दि.न्या.व.स्तर, पनवेल** |

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री.दामु लक्ष्मण दुधावडे यांचे संमतीने आमचे अशिलांना हस्तांतर करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती सदर हस्तांतर, कायम खरेदीखताने विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरहू मुळ मालकास नमूद मिळकत विक्री करण्याचे संपूर्ण हक्क व अधिकार असल्याची खात्री, हमी व भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे.

सबब सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी भेटून व कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी व स्वतःची लेखी हरकत आमचेकडे नोंदवावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी समजून सदर मिळकतीचा हस्तांतराचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सबब ही जाहीर नोटीस दिली असे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कांढरोली तर्फे बोरेटी, ता.खालापूर, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| २२ | ६ | सामाईक क्षेत्र ०-५१-२०<br>एकूण पो.ख.०-०५-८०<br>एकूण क्षेत्र ०-५७-०० | ८.३० |

येणेप्रमाणे जमीन मिळकत असे व तिचेशी अॅटॅच्ड हक्क, अधिकार व हितसंबंधाहीत दरोबस्त कळावे. ही जाहीर नोटीस दिली असे.
दि.११/१२/२०२१
ठिकाण : खालापूर

**सही/-**
**अॅड.श्री.एस.व्ही.क्षीरसागर**
**डी-६०७२, डी विंग, ६ वा मजला,**
**बिमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट,**
**कळंबोली, ता.पनवेल,**
**जि.रायगड, नवी मुंबई-४१०२१८**

---

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना सदर भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना सदर भूखंडाचे वाटपपत्र करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडघर (संचिका क्र. १६) | २६/१०४ | ११७/५<br>११७/६<br>८२/१+२अ<br>८२/८<br>८८/७ | ०-२६-७<br>०-२१-८<br>०-११-०<br>०-०२-०<br>०-११-९ | ६५० चौ.मी. | मौजे - करंजाडे नोड, भूखंड क्र. ८१ सेक्टर - २A, क्षेत्र - ६४९.४४ चौ.मी. | मा. न्यायालायीन वारस दाखल्यानुसार(प्रोबेट) पात्र ठरलेले मूळ भूधारक देहुबाई रामचंद्र केणी यांचे वारस<br>१) श्री. लहू रामचंद्र केणी<br>२) श्री. अंकुश रामचंद्र केणी<br>३) श्री. पांडूरंग रामचंद्र केणी | निरंक |
| | | | एकूण संपादित क्षेत्र | ०-७३-४ | | | | |
| | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | | |
| २ | उलवे १९४३ | गव्हाण ४६२ | ९/७ | ०-०२-० | एकूण मंजूर पात्रता ४० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. १८A सेक्टर - १८, क्षेत्र - ४० चौ.मी. | १. कै. महादेव बाळाराम कोळी (मयत) यांचे वारस<br>१. श्रीमती लक्ष्मीबाई महादेव कोळी<br>२. श्री. तेजस महादेव कोळी<br>३. श्री. विनायक महादेव कोळी<br>४. श्री. नितीन महादेव कोळी | |
| | | | एकूण | ०-०२-० | | | | |
| ३ | ३०२ कामोठे -२ | पनवेल ४२ | २५९/२ब पै | ०-६८-८ | ५९९.९५ चौ. मी. | मौजे पनवेल, भूखंड क्र. ४० सेक्टर-१९, क्षेत्र-५९९.९५ चौ. मी. | मूळ भूधारक<br>१) श्री. कमलाकांत उर्फ कमलाकर लक्ष्मण भगत<br>२) श्री. रमेश लक्ष्मण भगत<br>३) द्वारकानाथ लक्ष्मण भगत | निरंक |
| ४ | उलवे ८३८ | बंबावी ६(१) | २१/१<br>३२/५ | ०-२०-५<br>०-१०-४ | एकूण मंजूर पात्रता २५० चौ.मी. पैकी ५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. D-४ H, सेक्टर-८, क्षेत्र ५० चौ.मी. | १. चित्तरंजन कान्हा म्हात्रे | |
| ५ | उलवे ८३८ | १०(२) | ३२/६ | ०-०३-८ | ४० चौ.मी. | भूखंड क्र. १३९, सेक्टर-१९, क्षेत्र ४० चौ.मी. | १. चित्तरंजन कान्हा म्हात्रे | |
| | | | एकूण | ०-३४-७ | | | | |
| | | | नोड - द्रोणागिरी | | | | | |
| ६ | ७६७ | पागोटे ९४<br><br>पागोटे २९९ | ८८/५<br>३७/७अ<br>९६/२अ<br>१००/२<br>६८/३अ<br>५६/२<br>९७/३अ<br>११५/३<br>१२७/१३<br>२६/५ | ०-१३-४<br>०-०४-०<br>०-०३-६<br>०-२७-८<br>०-०४-३<br>०-०९-४<br>०-०१-८<br>०-१३-९<br>०-०९-०<br>०-०४-८ | ८०० चौ. मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. ४९, सेक्टर४१, क्षेत्र - ७९९.८७ चौ.मी. | १) श्री. मनोहर दुकल्या बंडा<br>२) श्री. प्रकाश दुकल्या बंडा<br>३) श्री. राम दुकल्या बंडा<br>४) श्रीमती विजया मनोहर पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
**सिडको/जनसंपर्क/३३९/२०२१-२२**

# संक्षिप्त...

## दत्तजंयती निमित्त आवरे येथे तालुका स्तरीय गायन स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

स्वर्गीय केशवबुवा म्हात्रे संगीत आदरांजली पुरस्कृत श्री दत्त जयंती उत्सवा निमित्त शनिवार दि.१८/१२/२०२१ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत श्री भोलानाथ मंदिर–आवरे, तालुका उरण येथे तालुका स्तरीय स्वर्गीय केशवबुवा म्हात्रे संगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख १६ डिसेंबर २०२१ असून स्पर्धकांनी, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी अधिक माहितीसाठी तसेच नाव नोंदणीसाठी महेश गावंड –९८७०२६१३७९, सदानंद म्हात्रे –९०८२४९५६३६ यांच्याशी संपर्क साधावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## द्रोणागिरी नोड मध्ये बहूउद्देशीय सांस्कृतिक भवनाची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी परिसराचा विकास जोमाने सुरु आहे. मात्र येथे बहूउद्देशीय सांस्कृतिक भवन नसल्याने जनतेची, नागरिकांची खूप मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. द्रोणागिरी परिसराचा सिडको विकास करीत आहे. द्रोणागिरी परिसरात देश विदेशातील लोक राहण्यास येत आहेत. परंतु सिडकोने द्रोणागिरी शहरात कोणत्याही प्रकारचे बहूउद्देशीय सांस्कृतिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. नागरिकांच्या सुख दुःखाच्या, विविध सणवारांना व सुख दुःखे सामूहिकरित्या साजरे करण्यासाठी कोणतेही साधन द्रोणागिरी शहरात वा परिसरात नाही. जनतेच्या,नागरिकांच्या मनोरंजनासाठी नाटक, सिनेमा गृह, भजन, कीर्तनासाठी व सार्वजनिक उत्सव साजरे करण्यासाठी, लग्नासाठी कोणतेही सभागृह द्रोणागिरी शहरात उपलब्ध नाही. शास्त्रीय गायन, सुगम संगीत, साहित्य संमेलन, कवी संमेलन असे सर्व प्रकारचे मनोरंजनाचे व समाज प्रबोधनाचे कार्यक्रम बहू उद्देशीय सांस्कृतिक सभागृह नसल्याने द्रोणागिरी परिसरात असे कार्यक्रम होत नाहीत त्यामुळे द्रोणागिरी परिसरातील जनताही यामुळे नाराज आहे. त्यामुळे सर्व प्रकारचे कार्यक्रम द्रोणागिरी शहरात व्हावेत यासाठी सिडको प्रशासनाने द्रोणागिरी शहरात त्वरित बहूउद्देशीय सांस्कृतिक भवन उभारावे अशी मागणी शिवसेना द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर यांनी सिडको प्रशासनाकडे लेखी पत्रव्यवहार करून केली आहे.

# वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्ग कायम चर्चेत व समस्यांच्या गर्तेत

## एम.एस.आर.डी.सी प्रशासनाचे दुर्लक्ष, अपघाती घटनांत वाढ

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

वाकण–पाली–खोपोली राज्य महामार्ग ५४८ (अ) रुंदीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मात्र हा मार्ग कायम या ना त्या कारणाने चर्चेत व समस्यांच्या गर्तेत दिसून येतो. सध्या मार्गावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे प्रवाशी, वाहनचालक व जनता धुरळ्याने अक्षरशः हैराण झाली आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर उडणारा धुरळा त्रासदायक ठरत असून अपघाती घटनांत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.एम. एस. आर. डी. सी प्रशासनाचे खड्डे भरणी व रुंदीकरण काम म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर असल्याची परिस्तिती आहे. पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धुरळा प्रवाशांना चहूबाजुनी त्रास अशीच परिस्तिती सातत्याने दिसून येत आहे. धुरळ्याला रोखण्यासाठी दुपारी व सायंकाळी पाण्याची फवारणी करण्यात यावी अशी मागणी प्रवाशी वर्गातून जोर धरत आहे.



या मार्गावर वाकण ते पाली, रासळ, वावे, चिवे, परळी, दुधानेवाडी, उंबरे, शेंबडी, मिरकूटवाडी ते पालीफाटा या ठिकाणी धुरळ्याची सर्वात अधिक समस्या आहे. खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात येणारी खडी माती जीवघेणी ठरत आहे. महामार्गावर सर्वत्र धुरळाराज दिसून येत आहे. मोटारसायकल स्वारांचे तर धुरळ्यामुळे पुरतेच हाल होत आहेत. या मार्गावरुन जातांना दुचाकीस्वारांचा धुळीशी थेट संबंध येतो. हेल्मेट घातलेली असतांना सुद्धा नाकातोंडात धूळ जाते. तसेच संपूर्ण अंगावर देखील धूळ उडते. वारंवार याचा त्रास होऊन दुचाकीस्वार बेजार झाले आहेत. याबरोबरच वाहनचालक व प्रवाशी वर्गाच्या नाकातोंडात धुरळा जात असल्याने आजाराला निमंत्रण मिळत आहे. श्वसनाचे विकार असलेल्यासह, लहान मुले व वृद्ध यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. तर धुरळा उडत असल्याने समोरून येणारी जाणारी वाहने दिसत नसल्याने अपघाती घटनांत वाढ झाली आहे. जागोजागी काम सुरू असल्यामुळे वाहने येथून गेल्यास संपूर्ण महामार्ग जणू धुरळ्याचा मार्ग असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पावसाळ्यात महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी माती आणि खडीचा वापर केला होता. आता ऊन पडून व वाहने जावून येथून धूळ बाहेर उडत आहे. याचा त्रास वाहन चालक, दुचाकिस्वार व प्रवाश्यांना होत आहे. तसेच महामार्गा शेजारील दुकानदार, हॉटेल व्यावसायीक व रहिवाशी देखील धुळीमुळे त्रस्त झाले आहेत. हा धुरळा वाहन चालक आणि प्रवाश्यांच्या अंगावर सर्वत्र बसतो. जणू धुरळ्याने आंघोळच होत आहे. महामार्गाशेजारी जी दुकाने हॉटेल आणि घरे आहेत त्यांना देखील या धुळीचा खुप त्रास सहन करावा लागतो. वारंवार उडणारी धूळ खाद्य पदार्थ आणि वस्तुंवर देखील बसते त्यामुळे सतत साफसफाई करावी लागते. हॉटेल मधील खाद्य पदार्थ दूकानातील व घरातील वस्तु आणि उपकरणे धुळीमुळे खराब होतात. त्यामुळे या मार्गाचे काम जलद गतीने करण्याची व्यावसायिक, चालक व प्रवाश्यांकडून होत आहे. या मार्गावर पाणी शिंपडण्यात यावे अशी मागणी प्रवाशी वर्गातून जोर धरत आहे.

# माथेरानचे राजकारण बनलेय तमाशाचा फड

**दै.रायगड नगरी । माथेरान**

समाजकारणाच्या जोडीला राजकारण करणे हा जरी शहराच्या विकासात्मक दृष्टिकोनातून जनतेच्या हितावह अविभाज्य भाग असला तरीसुद्धा माथेरान मधील राजकारणाने विशेषतः काही नगरसेवकांनी तर इथे निर्लज्जपणाचा कळस गाठलेला आहे ठराविक रक्कमेसाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात आणि पुन्हा कुणी वाढून रक्कम दिल्यास तिकडच्या पक्षात धाव घेतली जात आहे हा एकंदरीत प्रकार खूपच घृणास्पद असून याबाबत नागरिकांमधून तर्कवितर्क लढवले जात आहेत.

निवडणुकीच्या काळात ज्या उमेदवारांवर विश्वास ठेवून निवडून दिले होते म्हणजे एखाद्या तमाशाच्या फडासारखाच प्रकार सुरू झाला आहे जिकडे जास्त बिदागी तिकडे हे माथेरान मधील राजकीय फड धाव घेताना दिसून येत आहेत.त्यामुळे स्वाभिमानाची परिसीमा ओलांडून एकप्रकारे गलिच्छ राजकारणाने इथे वळण घेण्यास सुरुवात झाली आहे.पक्षाच्या उमेदवारांना मतदारांनी ज्यांच्यावर अति विश्वास व्यक्त करीत नगरपरिषदेच्या सभागृहात पाठवले होते त्यातील बहुतांश मंडळींनी मतदारांच्या विश्वासाला छेद देऊन आपल्या मर्जीनुसार वेळेप्रमाणे पक्षाशी गद्दारी आणि पुन्हा स्वगृही परतण्याची किमया करून दाखवली आहे.माथेरान हे खूपच लहान गाव आहे त्यामुळे जवळपास तीन हजाराच्या आसपास मतदार संख्या आहे. त्यामुळेच मतदारांना आर्थिक आमिषे देऊन ही मंडळी सहजपणे निवडून येतात यामध्ये जो खऱ्या अर्थाने निष्ठेने,निस्वार्थीपणाने गावाच्या हितावह कामे करू शकतो अशांना इथे पराभवाची धूळ चाखावी लागत आहे. कधी नव्हे तो ईथे मोठया प्रमाणावर पक्षांतर करण्याचा पायंडा पडण्यास सुरुवात झाली आहे.आता अशा मंडळींना यापुढे मतदार स्वीकारणार की टाळणार हे चित्र आगामी निवडणुकीत स्पष्ट होणार आहे.मागील काळात राज्यात विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा वेगवेगळ्या पक्षात प्रवेश होत गेल्याने याला अपवाद माथेरान तरी कसे असणार त्यामुळे इथेही अशाप्रकारे नगरसेवकांनी अंतर्गत मतभेदांमुळे तसेच वैयक्तिक लाभासाठी सुध्दा काही कारणास्तव अन्य पक्षात प्रवेश केलेले आहेत.

त्यामुळे ऐन थंडीच्या मोसमात सुध्दा इथले वातावरण तापले आहे. सद्यस्थितीत इथे जिल्ह्यातील आमदार, आणि प्रमुख नेतेमंडळींसह दिग्गजांनी आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सातत्याने हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे.आपल्या पक्षाला जेमतेम एक हजारांच्या आसपास मते प्राप्त होणार आहेत याची जाणीव असताना सुध्दा केवळ पक्षाच्या इभ्रतीसाठी आणि स्वतःच्या प्रतिष्ठेला धक्का लागू नये यासाठी सर्व खटाटोप सुरू आहेत. आजवरच्या विधान परिषदेच्या निवडणुकीत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार असल्याने त्यावेळेस प्रत्येक पक्षाच्या उमेदवारांकडून लाखो रुपयांची उलाढाल केली जात असते. आजवरच्या राजकीय इतिहासात माथेरान मधून सत्ताधारी गटाच्या लोकांनी स्वतःच्या पक्षाच्या उमेदवाराला भरघोस मते मिळवून दिली आहेत असे घडलेलेच नाही हे एक कटुसत्य आहे. लोकप्रतिनिधी जर स्वताच्या मतांचे पैसे घेत असतील तर नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये आम्ही का घेऊ नयेत असेही इथल्या मतदारांमधून सूर ऐकावयास मिळत आहेत.

## तळोजा पोलिसांची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात अवैधरित्या अवजड वाहनांची पार्कींग करणाऱ्या सहा जणांविरुद्ध तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे.

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात अनेक ठिकाणी अजवड वाहने उभी करण्यास परवानगी नाही आहे. त्यामुळे कित्येकदा अपघात होतात तसेच वाहतुकीस अडथळा होतो. याबाबत वारंवार सुचना करून सुद्धा वाहन मालक व चालक या सुचनांचे पालन करीत नसल्याने तळोजा पोलिसांनी वाहतूक शाखेच्या मदतीने या भागात उभ्या केलेल्या ट्रेलर, टँकर अशा एकूण सहा वाहन चालकांवर भादवी कलम २८३, मो.वा. कायदा कलम १२२/१७७ प्रमाणे कारवाई केली आहे व यापुढे सुद्धा अशा प्रकारची कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती सपोनि राजेंद्र जाधव यांनी दिली आहे.

# निस्वार्थ भावनेतून अपघातग्रस्तांना मदत करणारा कल्पेश ठाकूर खरा देवदूत : आ.महेंद्र दळवी

**दै.रायगड नगरी । पेण**

गेली १७ वर्षांपासून मुंबई–गोवा महामार्गावर अपघातात जखमी होणाऱ्या असंख्य अपघातग्रस्तांना निस्वार्थ भावनेतून मदत करणारा साई सेवक कल्पेश ठाकूर हा खरा देवदूत असल्याचे असे गौरवोद्गार अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी कल्पेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्य अहवालाच्या प्रकाशन सोहळ्याच्या वेळी काढले.




मी सुद्धा समाजसेवा करूनच आमदार झालो. महामार्गावर अपघातात जखमी होणाऱ्या व्यक्तींना स्वतःच्या गाडीतून तातडीने रुग्णालयात दाखल करून हजारो व्यक्तींचे प्राण वाचविणाऱ्या व महाड, पोलादपूर येथील दरडग्रस्तांना मदत करणाऱ्या कल्पेश ठाकूरचा आदर्श जिल्ह्यातील इतर युवकांनी घ्यावा व सामाजिक बांधिलकी जोपासावी असा सल्ला आमदार महेंद्र दळवी यांनी यावेळी दिला.

कोणताही मोबदला न घेता स्वतःच्या खाजगी गाडीतून सुरू केलेली सेवा व त्यानंतर साई सहारा प्रतिष्ठानच्या म्बुलन्स मधून अपघातग्रस्तांना तातडीची मदत देण्यास त्यांनी सुरवात केली. कोरोना व अपघातात प्राण वाचलेल्या शेकडो प्रवाशांचे आशीर्वाद कल्पेशच्या पाठीशी आहेत. कल्पेशने कोरोना काळात कोकणात पायी गावी निघालेल्या शेकडो नागरिकांना पिण्याचे पाणी, अन्न, वस्त्र उपलब्ध करून देऊन कोकणवासीयांना केलेली मदत खरोखरच उल्लेखनीय असून कल्पेश ठाकूरचे भविष्य उज्वल असल्याची प्रतिक्रिया पेणचे आमदार रवीशेठ पाटील यांनी याप्रसंगी बोलताना दिली.

या प्रसंगी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या कल्पेश ठाकूर यांचा आमदार महेंद्र दळवी व आमदार रवीशेठ पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला व्यासपीठावर अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, पेणचे आमदार रवीशेठ पाटील, विभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, महावितरणचे संजय ठाकूर, राजिपचे माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील, उद्योजक यशवंत घासे, तालुका प्रमुख तुषार मानकवले, सरपंच प्रदीप म्हात्रे, साई सहारा प्रतिष्ठानचे सुनिल पाटील, देवा पेरवी, नरेश पवार, जितेंद्र चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर व हितचिंतक उपस्थित होते.

## साळाव-मुरुड रस्त्याची कामे कधी होणार? नागरिक व प्रवासी वर्गाचा सवाल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

डिसेंबर महिन्यात पहिल्या आठवड्यात पडलेल्या अवकाळी पावसानंतर रस्त्यांची दुरवस्था पाहाता साळाव–मुरुड रस्त्यावरील नांदगाव स्टेट बँक समोरील खड्डा अपघाताला आमंत्रण ठरत असून या रस्त्यांच्या कामांना मुहूर्त कधी होणार ? असा सवाल नागरिक व प्रवासी वर्गातून विचारला जात आहे.

यंदा ढगफुटी सदृश अतिवृष्टीने, अवकाळी पावसाने साळाव–मुरुड रस्त्यांची अवस्था पुन्हा जैसे थे झाली आहे.विहूर,मोरे ते मजगांव, उसरोली फाटा, नांदगाव बाजार ते बाजारपेठ,वाघेश्वर नगर,दांडा,सर्वे, काशिद, काशिद यु–टर्न,बारशिव,बोर्ली स्टँड,कोर्लई भागात रस्त्यावर खड्ड्यांमुळे प्रवासी व वाहनचालक यांना त्रास व हाल सहन करावा लागत आहे.यारस्त्यावरील विहूर व चिकणी पूलाची अतिवृष्टीमुळे दुरावस्था झाली होती.या दोन्ही पुलाची कामे अपूर्ण असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.याकडे संबंधित लोकप्रतिनिधी तसेच सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून साळाव–मुरुड रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत व सुस्थितीतील रस्त्याची सुविधा उपलब्ध व्हावी. अशी अपेक्षा नागरिक व प्रवासी वर्गातून व्यक्त केली जात आहे.



## विहिघर-कोप्रोली रस्त्यावर पुन्हा खड्डे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विहिघर– कोप्रोली, नेरे रस्त्यावर पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले दिसून येत आहेत. त्याचा मनस्ताप वाहन चालकांना होत आहे.

पावसाळ्याच्या दिवसात पनवेल तालुक्यातील चिपळे –विहिघर, कोप्रोली –नेरे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले होते. याबाबत मनसे आक्रमक झाली होती. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील याबाबत आवाज उठवला होता. त्यानंतर निकृष्ट दर्जाचा साहित्य वापरून ठेकेदाराने खड्डे बुजवले. त्यामुळे थोड्याच दिवसात येथे पुन्हा खड्डे पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे या ठेकेदाराने खड्ड्यांवर थुक पट्टी लावल्याचा आरोप नागरिक करत आहेत. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे खड्ड्यांमुळे वाहनांच्या देखील नुकसान होत आहे. लवकरात लवकर खड्डे बुजवून नवीन रस्ता तयार करण्याची मागणी केली जात आहे.

# खंडीत पाणी पुरवठा आणि तांत्रिक अडचण निवडणुकीच्या तोंडावर माणगांवकर हैराण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पाणी पुरवठा जॅकवेल जवळ दोन लहान व दोन मोठे असे एकुण चार मोटर पंप आहेत. हे सातत्याने पाणी खेचुन जलशुध्दीकरण केंद्रात आणतात व येथे त्यावर शुध्दीकरण प्रक्रिया करुन पाणी पूरवठा केला जातो. एका वेळी एक मोठा आणि एक बारका पंप असे दोन पंप सतत चालु ठेवून हे काम आपल्या सक्शन लाईनच्या क्षमते नुसार करावे लागते. आज सकाळी यापैकी दोन छोटे पंप तांत्रीक बिघाडा मुळे नादुरुस्त झाले आहेत. नगरपंचायत ऐन निवडणुकीच्या तोंडावर हि पाण्याची समस्या माणगांवकरांच्या चर्चेला कार झाली असुन सोशल माध्यमावर नुसते संदेश फिरतायत मात्र पाणी कधी येणार या चिंतेने माणगांवकर हैराण आणि पाणी पुरवठा केंद्रात मोबाईल रिंगचा खणखणाट सुरु आहे.

आपल्या शहराच्या वाढत्या पाणी पुरवठ्याची गरज लक्षात घेता कमी दाबाने पाणी खेचले जात आहे. त्यामुळे सध्या पंप दुरुस्ती होईपर्यंत माणगांवकरांना खंडीत पाणी पुरवठा समस्येला सामोरे जावे लागत असुन पंप दुरुस्तीचे काम लवकर करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. आपण सर्वांनी पाणी जपून वापरणे हाच सध्या एकमेव पर्याय असुन माणगांवकरांकडुन येथील पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना सहकार्याची अपेक्षा आहे. वेगवेगळ्या कारणास्तव व एकुण विकास कॉलनी, उतेखोल भादाव, जुने माणगांवच्या लाईन नंतर दत्तनगर, वाकडाईनगर, परत जुणे माणगांव च्या लाईन नंतर आनंदभुवन, खांदाड,ऑफीस लाईन, तात्या लाईन, उतेखोलवाडी आणि शेवटी बालाजी असे जवळपास पंधरा लाईनला पाणीपुरवठा नियोजन केलेले आहे. परंतु कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने आता या सर्व लाईन एका दिवसात पूर्ण होऊ शकत नाहीत.

जर व्यवस्थित तांत्रीक अडचणीविना हे पंप सुरु राहीले तरच पाणीपुरवठा नियमीत ठेवणे सुरळीत जाते. अन्यथा लाईनचा पाणी पुरवठा विस्कळीत होतो. अशी ही सर्व पाणी पुरवठा यंत्रणा अहोरात्र चालु असते.

पाणी पुरवठा कर्मचारी तिन शिफ्ट मध्ये कामास असुन असा बिघाड झाल्यास सर्वांनाच त्याचा परिणाम सहन करावा लागत आहे. आता ही पंप क्षमता व स्टँण्डबाय यंत्रणा व जलदगतीने देखभाल दुरुस्ती वाढविणे या शिवाय नगरपंचायतीला दूसरा पर्याय उरला नाही.



सध्या माणगांवमध्ये नगरपंचायतीच्या निवडणुकीने जोर धरला आहे. प्रचारासाठी मताचा जोगवा मागायला उमेदवार आपल्या आपल्या विभागात फिरताना दिसत आहेत. निवडणूक आली की, मतदारांचे विविध हट्ट पुरवताना ७ वाजले कि घसे ओले, दिल की मुराद पूर्ण करताना व्यस्त असणाऱ्या उमेदवारांनी खरतर विकासाकडे पहायला हवे. माणगांव शहरात दिवसा गणिक वाढणारी लोकसंख्या पण नियोजन नसल्याने पाणी पुरवठा योजनेचा वाजलेला बोजवारा पाहायला मिळत आहे. दादा साबळेंच्या प्रयत्नातून कित्येक वर्ष आधी आलेल्या जुन्या पाणी पुरवठा योजनेवरतीच अजून माणगांवकरांना पाणी पुरवठा होतो. तेव्हाची आणि आत्ताची लोकसंख्या आणि परिस्थिती सारखी आहे का? पण असो निवडणूक आली की, प्रश्नावर आणि कामावर बोलण्यापेक्षा फायद्यावर जास्त बोलावे.